## भेटता

तुला शोधिले मी तुला शोधिले
भेटता तू आज मी सुखी झाले
तुला शोधिले … ||धृ.||

दिसला न होतास आसपास
केले दुर्लक्ष जेव्हां दिसलास
अदृश्य होता तू उदास झाले
तुला शोधिले … ||१||

जिथे तिथे तूच दिसू लागला
तुझ्या भेटीला जीव आसुसला
पाहण्या तुला वेडीपिशी झाले
तुला शोधिले … ||२||

भेटला आता नको जाऊ दूर
घेईल प्राणच अशी हूरहूर
सावर झणी मी कोसळले
तुला शोधिले … ||३||

– नारायण
०९/२४/२३